# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. ०४ अंतर्गत मौजा-कळमना, खसरा क्र. २१-२८/२, २२/३
**{सा.बां.वि. झोन क्र. ०८}** आणि २१-२८/९ येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्या करिता रु. १,११,०४,६४९/- (एक करोड अकरा लक्ष चार हजार सहाशे एकोनपन्नास) रकमेचे प्राकलन पद क्र. A43902371920 पदशिर्ष (१५ व्या वित्त आयोगा अंतर्गत वायु गुणवत्ता अनुदान व्यय) अंतर्गत विभागाव्दारे तयार केलेले आहे. सदर्हु रु. १,११,०४,६४९/- रकमेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निवीदा मागवुन हाती घेण्याचा व पद क्र. A43902371920 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A43902371920 (१५ व्या वित्त आयोगा अंतर्गत वायु गुणवत्ता अनुदान व्यय) अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हु कामास सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षात, सदर्हु पदा अंतर्गत राशी रु. १,११,०४,६४९/- चे प्रावधान प्राप्त आहे.
२. या कामास्तव मुख्य अभियंता सा.बां. विभाग यांनी CE/PWD/T.S./२११/२०२३-२४ दि. २६/१०/२०२३ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.
३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 803/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 05/03/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लकडगंज झोन क्र. ०८ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. ०४ अंतर्गत मौजा-कळमना, खसरा क्र. २१-२८/२, २२/३ आणि २१-२८/९ येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्या करिता रु. १,११,०४,६४९/- (एक करोड अकरा लक्ष चार हजार सहाशे एकोनपन्नास) रकमेचे प्राकलन पद क्र. A43902371920 पदशिर्ष (१५ व्या वित्त आयोगा अंतर्गत वायु गुणवत्ता अनुदान व्यय) अंतर्गत विभागाव्दारे तयार केलेले आहे. सदर्हु रु. १,११,०४,६४९/- रकमेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निवीदा मागवुन हाती घेण्याचा व पद क्र. A43902371920 अंतर्गत तरतुद करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.